| | | | |
|---|---|---|---|
| MHRT050008512023 | दाखल तारीख | : | २१.०९.२०२३ |
| | नोंदणी तारीख | : | २१.०९.२०२३ |
| | निकाल तारीख | : | १७.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०२ ०५ २६ |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i))

**खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

**(पिठासिन अधिकारी श्री. एस. एम. चव्हाण)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी.**

**(जाहीर दिनांक: १७.०३.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५१६/२०२३**

(गु.र.क्र.१०१/२०२३, रा.उ.शु., खेड)

**निशाणी क्र.६ लगत**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र सरकार**<br>**तर्फे निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग**<br>ता.खेड, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.व्ही.जी.गायकवाड** |
| **आरोपी** | **प्रशांत बाळासाहेब गुजर,**<br>वय – ४८ वर्षे,<br>रा.मु.पो.घाणेखुंट, गवळीवाडी, ता.खेड, जि. रत्नागिरी. |
| **प्रतिनिधीत्व** | **आरोपीकरीता वकील श्री.एस.एस.शेठ** |

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०९.०५.२०२३ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | ०९.०५.२०२३ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २१.०९.२०२३ |
| आरोपीला आरोपाचा तपशिल समजावून सांगितल्याची तारीख व त्याचे प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | १९.१२.२०२३ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | २७.१०.२०२५ |
| निकालाची आरक्षीत तारीख | १७.०३.२०२६ |
| निकालाची तारीख | १७.०३.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **प्रशांत बाळासाहेब गुजर** | फौ.प्र.सं.क.४१अ(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली. | -- | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे | निर्दोष मुक्त केले. | -- | निरंक |

# <u>न्यायनिर्णय</u>

## (घोषित दिनांक १७.०३.२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता चालविण्यात आला.

०२. अभियोग पक्षाकडून केवळ एकाच पंच साक्षीदाराला तपासण्यात आले. त्याच्या साक्षीतून आरोपीविरुद्ध दोषसिध्दीदर्शक पुरावे मिळून न आल्याने आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ नुसार निवेदन वगळण्यात आले.

०३. अभियोग पक्षाची हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपीचा बचाव विचारात घेता, मी खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्यावरील माझे निष्कर्ष मी त्या करिताचे कारणांसह विस्तृत करीत आहे.

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दि.०९.०५.२०२३ रोजी १६:०५ वा. मौजे घाणेखुंट, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे गवळीवाडी वस्तीचे पश्चिमेस बांबुच्या बेटाजवळ एका तात्पुरत्या झोपडीत आरोपी हा त्याच्या ताब्यात सु.३५ लि. मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन त्यापैकी एक कॅन हातभट्टी गावठी दारुने भरलेला तर दुसऱ्या कॅनमध्ये ३० लि. हातभट्टी गावठी दारु हा मुद्देमाल बेकायदेशीरपणे बाळगताना मिळून आला व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

०४. आरोपीविरुध्द निर्धारित केलेले दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने या न्यायनिर्णयाच्या 'भाग क' मधील नमुद साक्षीदारांच्या साक्षी पुराव्यांवर भिस्त ठेवली आहे.

०५. मी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सौ.व्ही.जी.गायकवाड, सरकारी अभियोक्ता व आरोपीकरिता विधीज्ञ श्री.एस.एस.शेठ यांचा युक्तिवाद ऐकला.

**विचारार्थ मुद्दा क्र.१ व २ करीता –**

०६. पंच साक्षीदार विजय लक्ष्मण महाडीक यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी केवळ पंचनाम्यावरील असलेली त्यांची स्वाक्षरी मान्य केली,

परंतु त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सदर साक्षीदाराचे असे कथन आहे की, पोलीसांनी त्यांची कोऱ्या कागदावर सही घेतली होती. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराला न्यायालयाच्या परवानगीने फितूर घोषित करुन सुचक प्रश्न विचारुन अभियोग पक्षाची हकिकत त्यांच्यासमोर मांडली. त्यामध्ये सदर साक्षीदाराने एकही बाब मान्य केली नाही. त्यामुळे अभियोग पक्ष सदर साक्षीदाराकडून घटनास्थळ पंचनामा सिध्द करु शकले नाही.

**०७.** अभिलेखाचे अवलोकन केले असता रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभियोग पक्षाकडून अद्यापही सादर करण्यात आलेला नाही, किंबहुना जो मुद्देमाल मिळून आला होता तो दारु म्हणजेच अल्कोहोल होता हे रासायनिक विश्लेषण अहवालाशिवाय शाबित होत नाही. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाकडून दुसऱ्या पंच साक्षीदाराला सुध्दा तपासण्यात आले नाही. फिर्याद तसेच केलेल्या कारवाईचा व जप्तीचा पंचनामा सिध्द झाला नाही. फिर्यादी व इतर साक्षीदारांना वेळोवेळी साक्ष समन्स काढूनही सहाय्यक सरकारी अभियोक्ता त्यांना हजर ठेवु शकले नाही. सबब, आरोपी हा बेकायदेशीरपणे विक्री करण्याच्या उद्देशाने गावठी हातभट्टी दारु बाळगून होता ही बाब शाबित झाली नसल्यामुळे मी विचारार्थ मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून विचारार्थ मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **प्रशांत बाळासाहेब गुजर** यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल यापुर्वी नाश केला

नसल्यास अपिल कालावधी संपल्यानंतर अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांच्याकडे विल्हेवाटीसाठी पाठविण्यात यावा.

३. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र पुढील सहा महिन्याकरीता लागू राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला.)

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.17 17:40:20 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,
ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १७.०३.२०२६**

भाग 'क'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.१ | विजय लक्ष्मण महाडीक | पंच साक्षीदार | ६ लगत |

### ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

### अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

### मुद्देमाल

| क्रमांक | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | सु.३५ लि. मापाचे दोन प्लॅस्टीक कॅन त्यापैकी एक कॅन हातभट्टी गावठी दारुने भरलेला तर दुसऱ्या कॅनमध्ये ३० लि. हातभट्टी गावठी दारु |
| २. | -- | आठ काचेची ग्लासे |
| ३. | -- | एक प्लॅस्टीक बादली |

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2026.03.17 17:40:26 +0530

**(एस. एम. चव्हाण)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खेड,
ता.खेड, जि.रत्नागिरी.

**दिनांकः १७.०३.२०२६**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | S.C.C.No.516/2023 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Court, Khed. |
| Date of Decision | : | 17.03.2026 |
| Judgment/Order signed by Presiding Officer on | : | 17.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.03.2026 |